॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

### जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २४ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्वीक हेल फाऊंडेशन यांच्यातील सामंजस्य करारान्वये जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्हयात ५० हजार विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षा जनजागृती करण्यात आल्याची माहिती क्वीक हेलचे अधिकारी अजय शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या फाऊंडेशनच्या वतीने कमवा व शिका या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री.शिर्के बोलत होते. यावेळी मंचावर व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दीपक पाटील, प्रा.नितीन बारी, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार, समन्वयक प्रा.मनिष जोशी उपस्थित होते. श्री.शिर्के म्हणाले की, या फाऊंडेशनच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत तीन जिल्हयात २० हजार विद्यार्थ्यांपर्यंत संवाद साधण्याचे लक्ष्य होते. मात्र प्रतिसाद पाहता ५० हजार विद्यार्थ्यांपर्यत जनजागृती करण्यात यश मिळाले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बरीच माहिती मिळाली. पुढच्या काळात सी प्लस प्लस प्रोग्राम सॉफ्टवेअर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरु केला जाणार आहे. तीन हजार आदिवासी विद्यार्थ्यांपर्यत जावून जीवनमूल्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे विनामूल्य समुपदेशन करण्यात आले असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पाटील यांनी क्वीक हेल फाऊंडेशनसमवेत झालेल्या करारातंर्गत लवकरच सायबर सुरक्षेवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे,अशी माहिती दिली. प्रा.मनिष जोशी यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन पूजा व ऐश्वर्या जगताप या विद्यार्थिनींनी केले. प्रा.मनोज पाटील यांनी आभार मानले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२४ ( ) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण आणि नियुक्ती कक्षामार्फत पुणे येथील दोन कंपन्यांसाठी झालेल्या परिसर मुलाखतीमध्ये १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील एम.सी.ए व एम.एस्सी. कॉम्प्युटर इन्फॉमेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसाठी एस ५ इन्फोटेक, पुणे आणि पीटासॅस सॉफ्टवेअर, पुणे या दोन नामांकित कंपन्यांनी विद्यापीठात परिसर मुलाखतींचे आयोजन केले होते. १७५ विद्यार्थ्यांनी ॲप्टीटयुड टेस्ट दिली. पीटासॅससाठी १० विद्यार्थ्यांची आणि एस ५ इन्फोटेकसाठी ४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. ॲप्टीटयुड टेस्ट नंतर समुह चर्चा आणि वैयक्तीक मुलाखती या प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार, कक्षाचे समन्वयक डॉ.भूषण चौधरी यांनी अभिनंदन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे- कविता ब्राम्हणकर, ऐश्वर्या जगताप, स्नेहल पाटील, किरण उशिल, भाग्यश्री पाटील, चेतना बोरसे, विशाल जोशी, राकेश पाटील, रश्मी कुलकर्णी, माधुरी सुर्यवंशी, समीर नारखेड, वैभव महाजन, प्रशांत खाचणे, लिना चौधरी, स्वाती जंगले.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 — दिनांक : 24 ऑक्टोबर,2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी